पहिल्याच पावसाने उघडे पाडले एपीएमसीच्या विकासाचे दावे

गटारलाइन, नालेसफाई आणि पायाभूत सुविधांवर व्यापाऱ्यांचा संतप्त सवाल

अन्य मार्केटमध्येही पाणी साचले

नालेसफाई, गटारलाइन आणि रस्त्यांच्या काँक्रिटीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही पहिल्याच पावसात बाजार समिती आवारातील सर्वच मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे बाजारातील व्यापारी, हमाल, कामगार आणि ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. भाजीपाला व फळ मार्केटमधील मुख्य प्रवेशद्वारावर पावसाचे पाणी तुंबल्याने ग्राहक आणि बाजार घटकांची मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्यापूर्वी या प्रवेशद्वारासमोरील रस्ता खोदून नव्याने काँक्रिटीकरण करण्यात आले होते. या कामासाठी सुमारे ७० लाख रुपयांचा खर्च झाल्याची चर्चा असून, तरीही दरवर्षीप्रमाणे यंदाही पाणी साचल्याने या कामांच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दुसरीकडे मसाला मार्केटमध्येही रस्ते आणि पावसाळी गटारलाइनच्या कामांमध्ये त्रुटी असल्याचे दिसून येत आहे. गटारलाइनची लेव्हल योग्य न ठेवल्याने अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा होत नसून रस्त्यांवर पाणी साचत आहे. यामुळे बाजारातील वाहतूक आणि दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत आहे. यापूर्वीही बाजारातील विविध विंगमधील गटारलाइनच्या कामांवर अंदाजे ६ ते ८ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र एवढा खर्च करूनही आजही पाण्याचा निचरा होत नसल्याने या कामांची गुणवत्ता पूर्णपणे ढासळली आहे. यावर चौकशी होणार का, असा प्रश्न बाजार घटकांकडून उपस्थित केला जात आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे प्रभावीपणे झाली नसल्याचा आरोपही केला जात आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात अनेक ठिकाणी पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. परिणामी, राष्ट्रीय महत्त्वाच्या या बाजारातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि प्रशासनाच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा-बटाटा मार्केटची पहिल्याच पावसात पुन्हा एकदा पोलखोल झाली आहे. बाजार परिसरात पावसाचे व घाण पाण्याचे मोठ्या प्रमाणात साचलेले पाणी, दुर्गंधी, अपुरी स्वच्छता, विस्कळीत मूलभूत सुविधा यामुळे व्यापारी, माथाडी कामगार, वाहतूकदारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. बाजार समिती आवारातील या मार्केटमध्ये आजही पिण्याचे पाणी, शौचालये, नियमित साफसफाई आणि सुरळीत पाणी निचऱ्याची व्यवस्था नसल्याने बाजार घटकांमध्ये तीव्र नाराजी आहे. इतकेच नव्हे, तर 'कांदा-बटाटा मार्केटमधील सुरळीत सुरू असलेली पावसाळी गटारलाइन दाखवा आणि बक्षीस मिळवा' अशी प्रतिक्रिया आता व्यापाऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटार दुरुस्ती, साफसफाई व इतर कामांच्या नावाखाली लाखो-कोट्यवधी रुपयांची कामे काढली जातात, मात्र

कांदा-बटाटा मार्केटसह विविध बाजारांमध्ये तुंबले पाणी

घाण पाणी, दुर्गंधी आणि अपुऱ्या सुविधांमुळे व्यापाऱ्यांचा संताप

राष्ट्रीय दर्जाचा बाजार, पण सुविधा शून्य!

पहिल्याच पावसात बाजाराची अवस्था पूर्ववत दिसत असल्याने या खर्चाच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'गटार लाइनच नीट नाही, नालेसफाईचा परिणाम दिसत नाही, मग हा पैसा नेमका जातो कुठे?' असा प्रश्न व्यापाऱ्यांकडून उघडपणे विचारला जात आहे. बाजार समिती प्रशासन व्यापाऱ्यांकडून नियमितपणे सेसची वसुली करत असले, तरी त्या बदल्यात आवश्यक सेवा आणि सुविधा देण्यात अपयशी ठरत आहे. घाण पाण्यातून व्यवहार करावे लागणे, अस्वच्छ वातावरणात काम करावे लागणे, पिण्याच्या पाण्याची गैरसोय, शौचालयांची दयनीय अवस्था आणि निचऱ्याच्या प्रश्नामुळे निर्माण होणारी दुर्गंधी या सगळ्या समस्या कायम आहेत. सेवा नाही, तर सेस कशासाठी? आकारता असा संतप्त सवाल व्यापारी वर्गाकडून विचारला जात आहे.

कित्येक वर्षांपासून या मार्केटमधील परिस्थिती गंभीर असल्याचा दावा व्यापारी सातत्याने करत आहेत. पावसाळ्यात पाणी साचणे, घाण आणि दुर्गंधीमुळे व्यवहारात अडथळे निर्माण होणे, वाहतूक कोंडी, माथाडी कामगारांना अस्वच्छ परिस्थितीत काम करावे लागणे आणि व्यापाऱ्यांना मूलभूत सुविधांशिवाय व्यवसाय करावा लागणे, या समस्या आता टोकाला गेल्याचे चित्र आहे. बाजार समितीला राष्ट्रीय महत्त्वाचा दर्जा मिळाल्यानंतर तरी बाजारात शिस्तबद्ध कामकाज, नियोजनबद्ध स्वच्छता आणि पायाभूत सुविधांची सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती बदलत नसल्याने प्रशासनाविषयी नाराजी तीव्र झाली आहे.

बाजार समिती आवारातील कांदा-बटाटा मार्केटमध्ये व्यापाऱ्यांना घाण पाण्यातून व्यवहार करावे लागत असतील, पावसाळी गटारलाइन आजही सुरळीत नसेल, मूलभूत सुविधा अपुऱ्या असतील आणि दरवर्षी कामांच्या नावाखाली खर्च होऊनही परिस्थिती बदलत नसेल, तर हा दर्जा आणि ही सेस वसुली नेमकी कोणासाठी? असा संतप्त सवाल आता बाजारातून उघडपणे विचारला जात आहे.

हक्कांसाठी लढू, अन्याय सहन करणार नाही!

काळू धरणग्रस्तांच्या बैठकीत सरकारविरोधात संघर्षाची रणनीती

◆ मुरबाड (प्रतिनिधी) :

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात मुंबईसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरसारख्या वाढत्या शहरांना पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने एमएमआरडीए यांच्या माध्यमातून प्रस्तावित असलेल्या काळू धरणाचा संघर्ष मान्सूनच्या आगमनापूर्वीच पेटण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

नुकताच 'काळू नदी धरणग्रस्त सामाजिक संस्था, काळू परिसर' यांच्या वतीने आंबिवली येथे काळू धरण विरोधी संघर्षाचे धोरण ठरविण्यासाठी परिसरातील शेतकरी व आदिवासी बांधव यांची यापुढील आंदोलनाची दिशा तसेच धरणसंबंधी प्रशासकीय पातळीवर सुरू असलेल्या हालचाली व त्यामुळे निर्माण झालेले शेतकरी प्रश्न या विषयी चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरकारच्या या अन्यायकारक धोरणाविरोधात सर्वच काळू व शाई धरण परिसरातील नागरिकांनी एकत्र येत रस्त्यावर उतरण्याची तयारी करण्याचे आवाहन जेष्ठ शेतकरी कार्यकर्ते हरिभाऊ राऊत यांनी केले. आगामी काळात प्रत्येक प्रसंगी धरणग्रस्तांच्या पाठीशी उभे राहून, संघर्षात साथ देण्याचे आश्वासन ठाणे जिल्हा देशमुख मराठा समाजोन्नती मंडळाचे अध्यक्ष विलासकाका देशमुख यांनी दिले.

यावेळी प्रस्तावित धरणामुळे परिसरातील आदिवासी बांधवांच्या निर्माण होणाऱ्या समस्या कान्हो

विस्थापनाच्या भीतीमुळे शेतकरी-आदिवासींचा एल्गार

माती, शेती आणि अस्तित्वाच्या लढ्यासाठी धरणग्रस्त एकवटले

शिद गुरुजी यांनी उपस्थित केल्या तर धरण क्षेत्राबाहेरील आदिवासी व जनसामान्यांच्या भावना रमेश खाकर व नामदेव शेंडे यांनी उपस्थितांच्या समोर मांडल्या. यावेळी पुढील काळात काळू व शाई धरणाच्या संयुक्त समिती यांनी निश्चित केलेल्या दिवशी रस्ता रोकोसारखे आंदोलन करून प्रशासनाला कडक इशारा देण्याची गरज असल्याचे अरुणबंधू चौधरी यांनी म्हटले. तर यापुढील काळात राजकीय दबाव आणणे यासारख्या विषयांना सर्वांनी एकत्र येऊन सामोरे जाण्याची गरज खुटल बा. चे उपसरपंच भावेश पठारे यांनी व्यक्त केली तर त्याला सर्वांनी एकमताने दुजोरा दिला.

यावेळी परिसरातील विश्वनाथ देशमुख, शशिबंधु देशमुख, नंदू राऊत, गणेश फनाडे, चंद्रकांत देशमुख, शाई संघर्ष समितीचे उमेश वारघडे व जयराम वारघडे, तर काळू परिसरातील गुलाब देशमुख, किसन आलम, अशोक देशमुख, शिवाजी निमसे, संभाजी देशमुख, नामदेव राऊत, नारायण देशमुख, रघुतात्या देशमुख, दिनकर देशमुख, अनिल कवटे, भाऊ पारधी, पांडू खडके, संभाजी गोडांबे, तळेगावचे सरपंच राजेंद्र शिंगवा उपस्थित होते.

वरुणराजाच्या आगमनाने बळीराजा सुखावला

◆ बाळासाहेब भालेराव

आजपासून भातपेरणी

मुरबाड : अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर मान्सून सक्रिय झाल्याने मुरबाड तालुक्यातील शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. जून महिन्यात पावसाने दीर्घ खंड दिल्यामुळे पेरण्या रखडल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतीकामांना वेग आला असून शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरूवारपासून भात पेरणीला सुरुवात होणार असल्याची माहिती शेतकरी वर्गणी दिली आहे.

तालुक्यातील करचोंडे, टोकावडे, वैशाखरे, मोरोशी, सावरणे, सरळगाव, शिवळे, कोरावळे, नारिवली, म्हसा, धसई तसेच परिसरातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी पेरणी, उखळणी आणि इतर शेतीकामांना सुरुवात केली

आहे. शेतांमध्ये पुन्हा एकदा लगबग वाढली असून बैलगाड्या, ट्रॅक्टर आणि शेती अवजारांची वर्दळ दिसून येत आहे.

यंदा मान्सूनच्या आगमनास विलंब झाल्याने भात, नाचणी, वरी तसेच इतर खरीप पिकांच्या लागवडीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र सध्या सुरू झालेल्या पावसामुळे जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण झाला असून रखडलेल्या पेरण्या मार्गी लागत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

डोंबिवलीत वृक्षांची पडझड

◆ कल्याण (प्रतिनिधी):

डोंबिवली एमआयडीसी निवासी परिसरामध्ये मंगळवारपासून पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यावर पहिल्याच पावसात निवासी भागात एकूण पाच झाडे कोसळली आहेत. सिस्टर निवेदिता स्कूल, ममता हॉस्पिटल रोड, मिलापनगर आर एल - ७८ आणि आरएल - ९० येथे ही झाडे पडली आहेत. विशेष म्हणजे यापैकी चार झाडे गुलमोहरची आहेत.

जर साधारण पडलेल्या पावसात एका दिवसात पाच झाडे पडत असतील तर पुढे वादळी, जोरदार पावसामध्ये काय परिस्थिती होईल याची तयारी आतापासूनच प्रशासनाने केली पाहिजे. पडलेली झाडे ही रस्त्यावरील भोवताली असलेल्या काँक्रिटमय भागाने वेढली असल्याने त्याची मुळे कुमकुवत झाल्याने ती पडली असावीत, असे काही वृक्षप्रेमींनी सांगितले. सुदैवाने झाडे पडल्याने कोणतीही मनुष्य आणि मालमत्ता हानी झाली नाही. ही पडलेली झाडे अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी येऊन रस्त्याच्या कडेला तोडून ठेवून रस्ता मोकळा केला.

कल्याण-डोंबिवलीत दोन दिवस नळ कोरडे

३० जून आणि ७ जुलैला २४ तास पाणीपुरवठा बंद

कल्याण (प्रतिनधी) : जलसंपदा विभागासोबत ९ जून रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयाप्रमाणे, आगामी कालावधीत पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवू नये म्हणून सर्व महापालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व अन्य प्राधिकरणांनी नियोजन करून प्रतिदिन २०% पाणीकपात करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या बारावे, मोहिली व नेतिवली जलशुद्धीकरण केंद्र येथून होणारा पाणीपुरवठा ३० जून व ७ जुलै रोजी २४ तास (सोमवारी रात्री १२ ते मंगळवारी रात्री १२ वाजेपर्यंत) बंद राहणार आहे. नागरिकांनी आवश्यक इतकाच पाणीसाठा करून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणेकरा जागा हो !

शहरभर झळकलेल्या रहस्यमय होर्डिंग्जची नागरिकांत चर्चा

'वेक अप ठाणेकर' असा एकच संदेश देणाऱ्या रहस्यमय होर्डिंग्जनी सध्या संपूर्ण ठाणे शहराचे लक्ष वेधून घेतले आहे. कोणत्याही संस्था, संघटना किंवा व्यक्तीचे नाव नसलेले हे होर्डिंग्ज शहरातील विविध भागांत झळकल्याने त्यामागील उद्देशाबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, घोडबंदर रोडसह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी हे होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. मात्र, त्यावर कोणतीही ओळख नसल्याने या मोहिमेमागे नेमके कोण आहे, याबाबत तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून ठाण्यात वृक्षतोड, रिंग रेल्वे, वाढते काँक्रिटीकरण, वाहतूक कोंडी, पर्यावरणीय ऱ्हास आणि अनियंत्रित विकास यांसारख्या मुद्द्यांवर सोशल मीडियावर नागरिकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यामुळे हे होर्डिंग्ज एखाद्या जागरूक नागरिक समूहाने किंवा सामाजिक चळवळीने उभारले असावेत, अशी चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे, केवळ तीन शब्दांचा संदेश असलेल्या या होर्डिंग्जनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ठाणेकरांना नेमके कोणत्या बाबतीत जागे करण्याचा प्रयत्न केला जात आहे? हा एखाद्या मोठ्या जनआंदोलनाचा प्रारंभ आहे का? की आगामी काळात एखादा महत्त्वाचा खुलासा होणार आहे? अशा अनेक चर्चांना उधाण आले आहे. सध्या या होर्डिंग्जमागील रहस्य कायम असले

तरी 'वेक अप ठाणेकर' हा संदेश मात्र शहरातील चहाच्या टपऱ्यांपासून सोशल मीडियापर्यंत चर्चेचा विषय बनला आहे. येत्या काही दिवसांत या मोहिमेचा खरा चेहरा समोर येतो का, याकडे संपूर्ण ठाणेकरांचे लक्ष लागले आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर कचरा वेचणाऱ्या कुटुंबातील तरुण बनला वकील

संघर्ष, जिद्द आणि शिक्षणाच्या बळावर निर्माण केला आदर्श

◆ कुणाल म्हात्रे

कल्याण : डम्पिंग ग्राऊंडलगत वसलेल्या साठेनगर वस्तीत अनेक कुटुंबांचे आयुष्य कचऱ्याभोवतीच फिरते. सकाळ उगवते ती कचऱ्याच्या ढिगाऱ्यात, दिवस जातो तो कचरा वेचण्यात आणि उद्याची आशादेखील त्याच कचऱ्यात हरवून जाते. अशी परिस्थिती असलेल्या या वस्तीतील रवी घुले या तरुणाने कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून स्वतःचे वेगळे भविष्य निर्माण केले आणि आज तो वकील बनून न्यायाच्या व्यासपीठावर उभा राहण्यास सज्ज झाला आहे. रवीच्या नावापुढे 'ॲडव्होकेट' ही पदवी अभिमानाने जोडली गेली आहे. पण या यशोगाथेमागे अनुबंध संस्थेच्या सामाजिक कार्यकर्त्यांची भक्कम साथ व रवीची जिद्द दडलेली आहे.

२०-२२ वर्षांपूर्वी अनुबंध या सामाजिक संस्थेने डम्पिंग ग्राऊंडलगतच्या साठेनगर वस्तीतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार केला. दारिद्र्य, उपासमार, असुरक्षितता आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या पिढ्या. कचरा वेचक कुटुंबातील मुलांनी शाळेचे दारही पाहिले नव्हते, अशा परिस्थितीत त्यांच्यामध्ये शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम अनुबंधच्या टीमने सुरू केले.

असंख्य मुलांसाठी आशेचा किरण

रवी घुलेचा हा प्रवास साठेनगरमधील असंख्य मुलांसाठी आशेचा किरण ठरला आहे. 'आपले भविष्यही बदलू शकते' हा विश्वास त्याने आपल्या यशातून निर्माण केला आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण, जिद्द आणि योग्य मार्गदर्शन मिळाले तर स्वप्नांनाही पंख फुटतात हाच संदेश त्याच्या यशोगाथेतून मिळत आहे. याचे श्रेय रवी घुले व त्याच्या कुटुंबाइतकेच अनुबंध संस्थेलाही जात आहे.

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

UJJIVAN

नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालय: ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये
1	4462210130000006 / 4462- कामोठे	१.रविंद्र एकनाथ कोथे, २ श्रीमती संध्या रवींद्र कोथे, दोघे येथे : येथे राहणार देव्हाणे, खोपोली पाली रोड, देव्हाणे, ता. खालापूर, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०३	०५.०८.२०२३ / ०१.०८.२०२३ अनुसार रु. १७२७६४९.२२	२१.०८.२०२६	रु. ८००००/- रु. ८००००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत – तळोजा पंचानंदच्या हद्दीमधील गाव रलोजा पंचानंद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे बांधण्यात आलेल्या "सुविधा अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ३९७ चौ. फू. (बिल्ट अप क्षेत्र) असलेल्या सदनिका क्र. १०९ चा सर्व खंड आणि भूखंड.				
2	4505218860000005 & 4505210090000003/ 4505- विरार	१.व्हाय. एस. ॲपरल्स, त्यांच्या प्रोप्रायटर तमिळ सेलवन ह्यांच्या द्वारे, २. तमिळ सेलवन (हमीदार), ३. वनिथा तमिळ सेलवन (हमीदार) सर्व राहणार: घर क्र. ७३४/११२ आणि ११३, पहिला मजला, गाळा क्र. १२२ आणि १२३, इमारत क्र. ए-१४, हरिहर कॉर्पोरेशन, दापोडे, भिवंडी – ४२१३०२. अनु. क्र. २ आणि ३ येथे देखील: सदनिका क्र. बी-१२/००१, तळ मजला, रीतू एन्क्लेव्ह, घोडबंदर रोड, आनंद नगर, मुच्छाला कॉलेज समोर, कावेसर, ठाणे ४००६१५.	०७.०६.२०२४/ ०५.०६.२०२४ अनुसार रु. ६२६७५०२.१४	२०.०९.२०२५	रु. ४१००००/- रु. ४१००००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : उप जिल्हा आणि उप नोंदणीकरण कार्यालय: भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणे आणि जिल्हा परिषद ठाणेमधील गाव : ओवळी, तालुका : भिवंडी, येथील जमिनीचा धारण केलेला एस. क्र. ६० एच क्र. २ वर बांधण्यात आलेल्या "पारसनाथ कॉम्प्लेक्स", ओवळी येथील इमारत क्र. "ए" च्या पहिल्या मजल्यावरील २९०.५२ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्रफळ किंवा साधारण तितक्याच असलेल्या धारण केलेला प्रस्तावित गाळा क्र. १०४ (मोजमाप साधारणपणे १५६३ चौ.फू.) आणि दुसऱ्या मजल्यावरील अंदाजे १५६३ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेल्या धारण केलेला प्रस्तावित गाळा क्र. २०४ असे एकूण ३१२६ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेल्या गाळ्याच्या बांधकामासाठी एफ. एस. आय. हक्कांचा सर्व खंड आणि भूखंड. आणि सीमा पुढील प्रमाणे: उत्तर: प्रस्तावित गाळा क्र. १०५, दक्षिण: प्रस्तावित गाळा क्र. १०३, पूर्व: पॅसेज, पश्चिम: खुली जागा, आणि वास्तविक ठिकाणानुसार : पूर्व: अंतर्गत रोड, पश्चिम: पाईप लाईन, दक्षिण: गोडाऊन, ज्याची मालकी **तमिळ सेलवन आणि वनिथा तमिळ सेलवन** ह्यांची आहे.			
3	4505210130000057/ 4505- विरार	१. श्री. मोहम्मद अमीन गाझी, २. श्रीमती फातिमा फारुख गाझी दोघेही येथे: सदनिका क्र. ६, ११८, काशमारी बिल्डींग, निशाणपाडा रोड, डोंगरी, झमझम हॉटेल जवळ, मुंबई, महाराष्ट्र ४००००९	११.१०.२०२१/ २७.०९.२०२१ अनुसार रु. १६३३०१७.००	२१.०९.२०२२	रु. ६००००/- रु. ६००००/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव सावरोली, (बुद्रुक), ता. शहापूर आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या आणि असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १५०, १५१, प्लॉट क्र. ४८ जूना गट क्र. ३०५, प्लॉट क्र. ४८ वर बांधण्यात आलेल्या "देल्वन अपेक्स" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पामधील "वीनेसा अपार्टमेंट" म्हणून ज्ञात इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील ५६५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०९ चा सर्व खंड आणि भूखंड.			

मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ	::	२७-०६-२०२६ आणि ११-०७-२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक	::	२९.०६.२०२६ पासून १३.०७.२०२६ रोजी ११.०० वा. पर्यंत
लिलावाचा दिनांक आणि वेळ	::	१४-०७-२०२६ रोजी दु. २:०० वा. ते सायं. ५:०० वा. दरम्यान

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत).

बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाण:
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१.
(संपर्क तपशील: अमोल जोशी : ७९००१२७५५५, चंद्रमोहन चौधरी: ८१०८८३८२८६.)

अटी आणि शर्ती : ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.

1. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्वि नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
2. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
3. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
4. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्ती: प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी **https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions** ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी **https://www.bankeauctions.com** ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी **support@bankeauctions.com,** लिलाव पोर्टल **https://www.bankeauctions.com** येथे देण्यात येईल.
5. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
6. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
7. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
8. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बँक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाण : महाराष्ट्र,
दिनांक : २५.०६.२०२६

सही/- प्राधिकृत अधिकारी,
उज्जीवन स्मॉल फायनांस बँक